Shri Guru Gobind Singhji Institute of Engg. & Tech. (MS) * NANDED *

# श्री अशोक बनकर - जिल्हा पोलीस उपअधिक्षक यांचे एस जी जी एस संस्थेत यु.पी.एस.सी. संदर्भात मार्गदर्शन

---

श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपूरी नांदेड या संस्थेत दिनांक 08 ऑगष्ट 2016 रोजी श्री अशोक बनकर, जिल्हा पोलीस उपअधिक्षक यांनी "**समाजाची बांधणी : आपल्यापासून सुरवात**" (Society Building : Let's begin with us" आणि यु.पी.एस.सी. परीक्षेची तयारी या विषयावर संस्थेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. एल. एम. वाघमारे, प्रमुख पाहुन म्हणून डॉ. जमदाडे - डॉ. शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचेसह व्यासपीठावर प्रा. बि.एम. दबडे, प्रा. अरूण कुमार पाटील हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीस या संस्थेची विद्यार्थिनी कु. रेष्मा शेख हिस ब्लाग रायटींग स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम आल्याबद्दल दै. लोकसत्ता कडून दै. लोकसत्ता चे प्रतिनीधी श्री मुकूंद कानेटकर यांचे उपस्थितीत प्रमुख पाुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देवून गौरविण्यात आले.

डॉ. जमदाडे यांनी अभियांत्रिकी शाखेत नवनविन करण्याची संधी उपलब्ध आहे व मला अभियंता व्हायचे होते पण मी डॉक्टर कसा झाले हे सांगीतले. तसेच वैद्यकीय क्षेत्राला मेडीकल अभियांत्रिकीचा खुप फायदा होतो आहे, वैद्यकीय क्षेत्रात संगणकाचा भरपुर वापर असून त्याचे श्रेय अभियांत्रिकीलाच जाते.

या प्रसंगी बोलतांना श्री अशोक बनकर, जिल्हा पोलीस उपअधिक्षक म्हणाले की, आपल्याला यशाला गवसणी घालावयाची असल्यास तुमच्याकडे दुर्दम्य इच्छा शक्ती असावी लागते, तुमच्या जिद्दी मुळे तुम्हाला झोप येत नाही, व झोपून पाहिलेली स्वप्न कधी खरी होत नाहीत पण उघडया डोळयानी पाहिलेली स्वप्न पुर्ण झाल्याशिवाय राहात नाहीत. आपले ध्येय नेहमी मोठ असल पाहिजे. त्यांनी आपल्या भाषणात अनेक थोर पुरूषांच्या जिवनचरित्राचा मागोवा घेतला व त्यांच्याकडून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असे सांगीतले. मानवी उत्क्रांतीची टप्पे सांगतांना अदिमानवापासून आजच्या आधूनिक इतिहासापर्यंतची माहिती विद्यार्थ्यांना सांगीतली.

तारूण्य म्हणजे आयूष्याला पडलेले स्पन आहे की नाही पण हे आयुष्यातील महत्वाचे वळन आहे. या काळात जर तुम्ही ध्येय प्राप्तीसाठी मेहनत घेतलात (constructive) तर पुर्ण आयुष्य आनंदान जगात पण हा काळ मौजमजेत खर्च कराल (destructive) तर जिवनभर पस्तावा कराल. असे कार्य करा की ज्या मुळे तुमचे वडील ताठ मानेने सांगतील की हे कार्य माझ्या मुलांने केलेले आहे. त्यांची मान खाली जाणार नाही याची काळजी घ्या. व्यसनाच्या आहारी जावू नका. यु.पी.एस.सी. परीक्षेच्या तयारी संदर्भात सुध्दा त्यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सिध्देश्वर खोतकर आणि कु. धनश्री घुगे यांनी केले तर आभार सुप्रतीक देशपांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यु.पी.एस.सी. चॅप्टरचे प्राध्यापक इंचार्ज डॉ. अरून कुमार पाटील यांनी परीश्रम घेतले.